# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.१४९२७ / २१ /अ.क्र.२६७९ /२६**

श्री. सुभाष बाळकृष्ण घाडगे
सहयोग ओम साई को.ऑ.हौ.सो.लि.,
सेंट फ्रान्सिस रोड, विलेपार्ले (प.), मुंबई-४०००५६.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) के/पश्चिम विभाग,
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त, के/पश्चिम विभाग
यांचे कार्यालय, दुसरा मजला, बी.ई.एस.टी. डेपोसमोर, पालीराम पथ,
अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (परि.) के/पश्चिम विभाग,
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त, के/पश्चिम विभाग
यांचे कार्यालय, दुसरा मजला, बी.ई.एस.टी. डेपोसमोर, पालीराम पथ,
अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०३.२०२६</u>**

अपीलकर्ता — अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी — उपस्थित (प्रतिनिधी)
प्रथम अपीलीय अधिकारी — अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १९.०५.२०२१ | ११.०६.२०२१ | ०३.०७.२०२१ | ०४.०३.२०२२ |

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीनी दाखल केलेल्या दि.१९.०५.२०२१ रोजीच्या जोडपत्रानुसार विलेपार्ले येथील सेंट फ्रान्सिस या रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत एकूण सहा मुद्द्यांची माहिती मागितली असून तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी मागितलेली माहिती ही विस्तृत स्वरूपाची असल्याने त्याचे निरीक्षण करून सशुल्क माहिती प्रदान करता येईल असा प्रतिसाद दिनांक ११.०६.२०२१ रोजी प्रदान केला असून वरील प्रतिसाद हा दिशाभूल करणारा, वेळ काढूपणाचा, माहिती देण्यास निष्काळजीपणा, कामांमध्ये दिरंगाई केल्याचा आरोप-प्रत्यारोप करीत अपिलार्थीनी प्रथम अपील अर्ज दाखल केलेला आहे. याबाबत प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, के/पश्चिम यांनी दि.११.०२.२०२२ व दि. ०४.०३.२०२२ रोजी सुनावणी आयोजित केली होती त्यास अपिलार्थी अनुपस्थित असल्याचे नमूद करीत जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थीना अपेक्षित

असलेली माहिती विहित शुल्क आकारून उपलब्ध करून द्यावी असे नमूद करीत अपिलार्थीना विनामूल्य माहिती देण्याची विनंती फेटाळून लावली असल्याचे आढळून येते.

प्रस्तुत प्रकरणी आज झालेल्या सुनावणीस अपिलार्थी हजर नाहीत. तथापि, विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी या संदर्भात मागितलेली माहिती ही अतिशय व्यापक स्वरूपाची असून अपिलार्थीनी त्याचे निरीक्षण केल्यास त्यांनी चिन्हांकित केलेली माहिती त्यांना उपलब्ध करून देता येईल असे नमूद केले आहे.

ही बाब लक्षात घेता दिनांक २४.१२.२०२१ रोजी दाखल केलेला प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज अंशतः मंजूर करीत व अपिलीय अधिकाऱ्यांच्या आदेशात अंशतः परिवर्तन करीत अपिलार्थीनी अवलोकन करून चिन्हांकित केलेली **दीडशे पृष्ठांपर्यंतची माहिती विनामूल्य** देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २३-०३-२०२६**

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra

Jyotsna